# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Sociology

## Assignment

## Session: 2018 – 2019

यशोदा गर्ल्स आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज
स्नेह नगर नागपुर

नाव : दुर्गा हरिश्चंद्रजी डोईजड

वर्ग : बी. ए. भाग २ III sem

विषय : [Assigment] समाजशास्त्र

सत्र :- 2018 – 2019

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

मार्गदर्शक
डॉ. प्रकाश सोनक

SEAL
Yashoda Girls Arts & Commerce College Nagpur

# आत्महत्या किंवा स्वहत्येचा सिद्धांत

## (Theory of suicide)

दुर्खीमने १८९७ मध्ये लिहिलेल्या 'The suicide' या ग्रंथात आत्महत्ये संबंधीचे विवेचन केले आहे. एनसाइक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका (Encyclopaedia of Britannica) मध्ये 'आत्महत्या (स्वहत्या) ही आपल्या इच्छेनुसार मुद्दाम केले गेलेले आत्महनन (स्वहनन) होय.' अशी व्याख्या करण्यात आली आहे. दुर्खीमने 'आत्महत्या' या विषयामध्ये समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे.

दुर्खीमच्या मते, 'आत्महत्या (स्वहत्या) हे एक सामाजिक तथ्य आहे. आणि इतर सामाजिक तथ्यांप्रमाणेच आत्महत्या देखील व्यक्तीबाह्य असून व्यक्तीवर त्याचा दबाव पडत असतो.' आत्महत्या ही एक आत्मविनाशाची (स्वविनाशाची) प्रक्रिया आहे, ही गोष्ट दुर्खीमला मान्य नाही.

दुर्खीमच्या दृष्टिकोनातून आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आहे. ज्याची सामाजिक कारणांच्या रुपात व्याख्या केली जाऊ शकते. दुर्खीमने आपल्या या अध्ययनातून असा निष्कर्ष काढला की, आत्महत्ये करिता मानसिक, जैवकीय, प्रजातीय, भौगोलिक, जलवायु ही कारणे जबाबदार नाहीत. दुर्खीम किंवा दारिद्र्य, दुःख, प्रेम या इतर वैयक्तिक कारणे ही आत्महत्येकरिता कारणीभूत नाहीत. दुर्खीम स्पष्टपणे म्हणतो की, 'आत्म

हत्या ही सामाजिक एकीकरणाच्या अभा-
-चा परिणाम आहे.'
'सामाजिक एकीकरणाच्या अभावामुळेच
आत्महत्या घडुन येते.' हा दुर्खीमच्या
निष्कर्ष आहे. समाज हा जितका दुर्बल
असेल, तितका व्यक्ति स्वतंत्र होतो आत्म
निर्भर होण्याच्या प्रयत्न करतो आणि
आपल्या स्वार्थाची पुर्ती करण्यामध्ये
मग्न होतो. परंतु जेव्हा समाज हा
संघटित होतो आणि शक्तिशाली असतो
तो तेव्हा तो व्यक्तिवर नियंत्रण ठेवतो-
त्यांना आपल्या सेवेमध्ये ठेवतो. तसेच
त्यांना केवळ आपल्याच इच्छा, आकांक्ष
मध्ये विशेष अभिरुची घेण्यापासुन परावृत्त
करतो. अशाप्रकारे त्यांना त्यांच्या कर्तव्य
उल्लंघन करण्यापासुन रोखतो. दुर्खीम
म्हणतो की, 'व्यक्ती आपल्या समाजा-
प्रती असलेल्या कर्तव्याचे उल्लंघन
आत्महत्येद्वारा करतो.' या दृष्टिने आत्मह-
त्या हे एक सामाजिक तथ्य आहे. ते
मानसिक तथ्य नाही. विशेष म्हणजे
आत्महत्या हा सामाजिक एकीकरणाच्या
अभावाच्या परिणाम आहे.
'आत्महत्या हा सामाजिक
एकीकरणाच्या अभावाच्या परिणाम आहे.'
हे सिद्ध करण्याच्या दृष्टिने दुर्खीमने
धार्मिक समुह किंवा कुटुंब समुहाची
उदाहरणे दिली आहेत. जसे सामाजिक

एकीकरण असेल, तेथे आत्महत्येची प्रवृत्ती आढळणार नाही, अशा प्रकारचा प्रभाव हेवत असतो. कारण धर्म समाज आहे. अर्थात धार्मिक जीवन हे सामुहिक जीवनाच्या प्रतिनिधी आहे.

जे कुटुंब संघटित आणि सुखी आहे; ज्यामधील सर्व सदस्य हे घनिष्ठ संबंधाने एकदुसऱ्याशी बांधलेले आहेत, त्यांच्यात प्रेम आणि सहानुभूतीची भावना असते. अशा कुटुंबातील व्यक्ति आत्महत्या करीत नाही. कारण हे कुटुंब एक संघटित आणि जवळच्या संबंधित व्यक्तींचा एक समुह असतो जो व्यक्तिला आत्महत्येपासुन रोखतो आणि जिवनातील एकाकीपणा तसेच वाईट गोष्टींना दुर ठेवतो. याच कारणामुळे विवाहितांपेक्षा अविवाहित व्यक्ती जास्त प्रमाणात आत्महत्या करतात.

आत्महत्येसाठी सामाजिक घटक महत्त्वपुर्ण:

आत्महत्येसाठी सामाजिक घटक किंवा कारणे हे अत्याधिक महत्त्वपुर्ण आहे असे दुर्खीमचे मत आहे. दुर्खीमच्या मते, सामाजिक पर्यावरणाच्या काही अवस्थांचा आत्महत्येशी अधिक संबंध असुन तो प्रत्यक्ष किंवा स्थिर आहे. तर जैवकीय किंवा आत्महत्येशी ~~आ~~ भौतिक पर्यावरणाच्या तथ्यांचा आत्महत्येची संदर्भात अध्ययन केले त्यांनी आत्महत्येवर आतापर्यंत ज्या समाजशास्त्रज्ञांनी आत्महत्येच्या संदर्भात

अनिश्चित आणि अस्पष्ट संबंध आहे
आतापर्यंत ज्या समाज शास्त्रज्ञांनी
आत्महत्येच्या संदर्भात अध्ययन केले
त्यांनी आत्महत्येवर भौतिक कारकांच्या
प्रभाव महत्त्वपूर्ण मानला. जर स्त्रिया
पुरूषांपेक्षा कमी आत्महत्या करतात त
याचे प्रमुख कारण म्हणजे स्त्रिया या
पुरूषांपेक्षा सामुहिक अस्तित्वामध्ये फारच
कमी प्रमाणात सहभाग घेतात. त्यामुळे
त्या सामाजिक अस्तित्वाच्या चांगला किंवा
वाईट प्रभाव कमी प्रमाणात अनुभव
करतात. हीच गोष्ट अधिक वय असलेले
लोक आणि मुलांच्या संदर्भात लागु
पडते. जानेवारी मध्ये आत्महत्या जास्त
प्रमाणात घडतात. तर त्यानंतर आत्महत्येचे
प्रमाण कमी होते.

या सर्व तथ्यांच्या आधारावर
दुर्खीम असा निष्कर्ष निघतो की; 'सामाजि
क आत्महत्येच्या दराची व्याख्या केवळ
समाजशास्त्रीय आधारावरच केली जाऊ शक
कोणत्याही निश्चित वेळी समाजाचे नैतिक
विधान ऐच्छिक मृत्युकरिता अनुकूल परिस्थिती
निर्माण करते, म्हणुन प्रत्येक व्यक्ति आपल्या
वर विशेष प्रकारच्या शक्तीच्या दबावाच्या
अनुभव करते; जी त्याला आत्महत्या कर
स प्रेरित करते. आत्महत्या करणाऱ्याचे क
हे प्राथमिक रूपात त्याच्या वैयक्तिक
स्वभावाला व्यक्त करतांना आढळतात. परं

वास्तविकत: सामाजिक परिस्थितीच्या पूरक आणि विस्ताराने कार्य होत असते ज्याची बाह्य अभिव्यक्ती ही आत्महत्येच्या रूपाने होत असते.

प्रत्येक मानव समाजात आत्महत्या :

दुर्खीमच्या मते, प्रत्येक मानव समाजात अधिक किंवा कमी रूपात आत्महत्येची प्रवृत्ती आढळून येते. संपूर्ण सामाजिक समुहाची प्रवृत्ती ही व्यक्तिंना प्रभावित करून त्यांना आत्महत्येकरिता प्रेरित करते. ज्या व्यक्तिगत अनुभवांना साधारणत: आत्महत्येचे प्रमुख कारण मानले जाते. तो केवळ असा प्रभाव मात्र आहे की, ज्याच्या आत्महत्या करणाऱ्या व्यक्तिच्या नैतिक प्रवृत्ती मधून होतला जातो. आणि ही नैतिक प्रवृत्ती स्वत: समाजाच्या नैतिक अवस्थांची प्रतिध्वनी आहे. व्यक्ति आपल्या बाह्य परिस्थितिमुळेच दु:खी किंवा निराश होतो. आणि बाह्य परिस्थिती त्याची जिवनाची ही किंवा ती घटना नसुन तोच समुह असतो की, ज्याचा तो सदस्य आहे. अशाप्रकारे कोणतीही गोष्ट परिस्थिती किंवा समाज नाही की, जे व्यक्तिला आत्महत्या करण्यास प्रेरित करू शकणार नाहीत. हे तर संपूर्णपणे त्या कारणावर निर्भर असते की, जे आत्महत्येकरिता जबाबदार असुन ते इतक्या तीव्रतेने व्यक्तिला प्रभावित करतात.

आत्महत्येच्या विश्लेषणामधील समाजशास्त्रीय निष्कर्ष : (Sociological conclusions of Analysis of suicide)

आत्महत्येच्या संदर्भात दुर्खीमने सामाजिक दृष्टिकोनातून विचार केला. त्यांनी आपल्या सांख्यिकीय सामग्रीच्या आधारावर आत्महत्ये संबंधी काही सामाजिक महत्त्वाचे परिणाम आणि निष्कर्ष मांडले आहेत.

(1) लोकसंख्येच्या दृष्टिने प्रत्येक वर्षी आत्महत्येचे प्रमाण बहुतेक एकसारखे आहे.

(2) स्त्रियांपेक्षा पुरुष आत्महत्या अधिक प्रमाण करतात.

(3) युवकांपेक्षा वृद्धांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे.

(4) ग्रामीण समुदायाच्या तुलनेत नागरी समुदायात आत्महत्येचे प्रमाण अधिक आढळते.

(5) विवाहितांपेक्षा अविवाहित विधुर, विधवा आणि परित्यक्त्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे.

(6) विवाहितांमध्ये अपत्य असलेल्या लोकांपेक्षा अपत्य नसलेल्या लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे.

(7) कॅथलिक पंथीय लोकांपेक्षा प्रोटेस्टंट पंथी लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे.

(८) सैनिक, सामान्य जनतेपेक्षा जास्त आत्महत्या करतात.
(९) हिवाळ्यापेक्षा उन्हाळ्यात आत्महत्येचे प्रमाण अधिक आढळते.

आत्महत्येच्या विचार प्रवाह (suicidal currents):

दुर्खीमने आपल्या अध्ययनातून असा निष्कर्ष मांडला की, 'आत्महत्येचा विचार प्रवाह' (suicidal currents) सामाजिक संघटनेच्या विशिष्ट अवस्थेमधून उत्पन्न होतो. आणि त्याच्या व्यक्तिवर यंत्रासारखा प्रभाव टाकून त्यापैकी काहींना आत्महत्या करण्यास बाध्य करतो. हा आत्महत्येचा विचार प्रवाह व्यक्ती करिता तितकाच वास्तविक आणि त्यापासून तितकाच वेगळा आहे. ज्याप्रमाणे रोगाद्वारा मृत्युला आणणारी भौतिक आणि प्राणिशास्त्रीय शक्ती असते. आत्महत्येच्या विचार प्रवाहामुळे पिडितांची संख्या ही पुर्वनिर्धारित असते. जे सर्वात कमी प्रतिरोध करतात, तेच आत्महत्येला बळी पडतात. रोगाप्रमाणेच आत्महत्येमध्ये देखील एक व्यक्तिगत कारक आहे. परंतु हे मृत्युंची संख्या निर्धारित करीत नसुन कोण मरेल याचे निर्धारण करतो. व्यक्तीला स्वत: किंवा इतर लोकांना असे वाटत असते की तो व्यक्तिगत प्रेरणामुळे आत्महत्या करीत आहे. परंतु वास्तविकता ही आहे की,

तो अनभिज्ञ अशा अवैयक्तिक शक्ती द्वारे आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.

आत्महत्येचे प्रकार (Types of suicide):

दुर्खीमच्या मते, समाजात आत्म केंद्रीत विचारप्रवाह, परार्थवादी विचारप्रवाह आणि प्रमाणशुन्य विचार प्रवाह अशा तीन प्रकारचे विचार प्रवाह आढळतात. या तीन विचार प्रवाहामुळेच व्यक्ती आत्महत्या करतात. या तीन विचार प्रवाहाच्या आधारावरच आत्महत्येचे तीन प्रकार आहेत.

(१) अहंवादी किंवा स्वकेंद्रीत आत्महत्या (Egoistic suicide)
(२) परार्थवादी आत्महत्या (Altruisic suicide)
(३) प्रमाणशुन्य आत्महत्या (Anomique suicide)

अशाप्रकारे आत्महत्या ही कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या सामुहिक विघटनाच्या कारणामुळेच होते. विशेष म्हणजे आत्महत्या हे सामाजिक एकतेच्या अभावाचे प्रतिक आहे. आत्महत्या ही एकांत अपेक्षाची भावना किंवा अत्याधिक व्यक्तिवादाच्या भावनेमुळे घडुन येते.

(१) स्वकेंद्रीत आत्महत्या (Egoistic suicide)

अशा प्रकारची आत्महत्या म्हणजे आधुनिक मानवाच्या स्वभावविशेषांचा उद्रेक होय. आधुनिक काळात व्यक्ती

हा जास्तीत जास्त व्यवहारी, स्वार्थी आणि स्वकेंद्रीत होत आहे. व्यक्ती आपल्या सामाजिक जीवनात घडणाऱ्या गोष्टींचा विचार 'मी'-च्या संदर्भात करू लागला आहे. अलीकडे व्यक्तिमध्ये 'मी' किंवा 'अहं' ही भावना विशेष रूजलेली असल्याचे आढळते. दुर्खीमच्या मते, अशा प्रकारची भावना व्यक्तीस समाजापासून वेगळे करते. व्यक्ती सुद्धा स्वतःला समाजापासून वेगळे समजतो. तो केवळ स्वतःच्या संदर्भातच विचार करून आत्मकेंद्रित होतो. आणि शेवटी हीच भावना किंवा परिस्थिती व्यक्तीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते.

जेव्हा समाजातील इतर लोक हे आप-आपल्या कामात व्यस्त होतात तेव्हा काही लोक असा विचार करतात की, आपली उपेक्षा होत आहे. आणि जेव्हा त्यांच्या स्वकेंद्रीत वृत्तीचे प्रमाण अधिक वाढते तेव्हा ते स्वतःला समाजापासून वेगळे करतात. दुर्खीम म्हणतो की, स्वकेंद्रीत आत्महत्या ही याच परिस्थितीची चरण सीमा होय. अविवाहित की परित्यक्त लोक अधिक आत्महत्या करतात. कारण कौटुंबिक जीवनापासून त्यांचा संपर्क कमी होतो. प्रोटेस्टंट पंथाचे लोक जास्त प्रमाणात आत्महत्या करतात कारण त्यांच्यात सामाजिक संपर्क कमी आढळतो. याउलट कॅथालिक पंथाच्या लोकांम

त्ये सामुहिक भावना अधिक असते. त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण कमी असते. हिवाळ्यापेक्षा उन्हाळ्यामध्ये सामाजिक संपर्क कमी होतो. त्यामुळे उन्हाळ्यात अधिक प्रमाणात आत्महत्या होत असतात. सामाजिक आंदोलने किंवा युद्धाच्या काळात आत्महत्येचे प्रमाण की कमी होते. कारण या वेळी त्यांच्यात सामुहिक भावना जास्त असते. वैयक्तिक गोष्टींना बाजुला सारुन सामाजिक आणि इतर कार्यमध्ये लोक अधिक भाग घेतात. सामाजिक एकीकरण वाढते. ह्यामुळे सामाजिक आंदोलने किंवा युद्धाच्या वेळी लोकांमध्ये आत्मकेंद्रीत भावना विशेष आढळत नाही. म्हणुन त्यांच्यात आत्महत्ये-चे प्रमाण अत्यल्प आढळते.

थोडक्यात, ज्यावेळी व्यक्ति केवळ स्वतः-च्या संदर्भात विचार करते; त्यांच्यात स्वकेंद्रीत प्रवृत्ती वाढते त्यावेळी ते स्वतः-ला समाज किंवा समुहापासुन अलिप्त करतात. या परिस्थितीमुळे जो आत्महत्या घडुन येते. त्यास स्वकेंद्रीत आत्महत्या असे म्हणतात.

(२) परार्थवादी आत्महत्या (Altruistic suicide):

व्यक्ति समाज किंवा समुहामध्ये इतका मिसळुन जातो की, त्याचे संपुर्ण व्यक्तीत्व समाज किंवा समुहमध्ये एकरुप

होते. त्याचे स्वतःचे काही मुल्य राहत नाही. तो केवळ समूहाच्या एक सदस्य मात्र राहतो. जो पूर्णपणे समूहाद्वारा नियंत्रित होतो. अशा परिस्थितीमध्ये व्यक्तीमत्त्वाचे अस्तित्व संपुष्टात येते. तो समाज किंवा समूहाच्या दृष्टिने विचार करतो, बघतो किंवा काही कार्य करीत असतो. याच गोष्टीकडे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातुन बघितले तर असे म्हणता येईल की, व्यक्तिमध्ये समुहाच्या प्रति एका अशा उत्तरदायित्वाच्या भावनांच्या विकास होतो की; व्यक्ती समुहाकरिता कोणत्याही वेळी आवश्यकता पडल्यास प्राण देण्यास तयार होतो. भारतातील 'सती प्रथा' आणि जपानमधील 'हरा-किरी'ची प्रथा या परार्थवादी आत्महत्येचे उदाहरण होय.

देश किंवा राष्ट्राकरिता बलिदान करणारे सैनिक, जहाजावरोबर जलसमाधी घेणारे कप्तान ही सर्व परार्थवादी आत्महत्येचे उदाहरणे होत. सिलोनमधील 'लिट्टे' नावाची एक संघटना आहे. या संघटनेमध्ये काही कार्यकर्त्यांचा एक असा गट आहे की, ते आपल्या संघटनेसाठी मरायला तयार असतात. यावरुन हे स्पष्ट होते की, गट किंवा समाजाशी व्यक्ति एकरुप होते आणि ती स्वतःचा विचार न करता गट किंवा समाजाच्याच विचार करते तेव्हा व्यक्तीमध्ये परार्थवादी भावना निर्माण होते. या परार्थवादी भावनेमुळे लोक आत्महत्या करतात.

परार्थवादी आत्महत्येच्या संदर्भात पारसन्स (Parsons) म्हणतो की, 'परार्थवादी आत्महत्या' ही सामुहिक आत्महत्येचे प्रदर्शन आहे की, ज्यामध्ये व्यक्ती वैयक्तिक हितांना सामुहिक हिताखाली दाबून ठेवण्यामध्ये समर्थ होतो, जो सामुहिक जीवनापेक्षा वैयक्तिक जीवना-करिता त्यांच्या पातळीवरचे मुल्यांकन करतो.'

(३) प्रमाणकशुन्य किंवा असामान्य आत्महत्या (Anomic suicide)

दुर्खीमच्या मते, जेव्हा समाजाची संरचना, सामाजिक संतुलन किंवा समाजाच्या नैतिक संघटनामध्ये अचानक किंवा अस्वाभाविक परिवर्तन घडून येते. आणि समाजाचे सदस्य या नविन परिवर्तनाशी समायोजन करण्यामध्ये अयशस्वी होतात तेव्हा आर्थिक, मानसिक अशांतता आणि तणावाच्या अनुभव व्यक्ती करू लागतो. आणि यामधून मुक्ति मिळविण्यासाठी व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात.

अशाप्रकारची आत्महत्या ही प्रामुख्याने कौटुंबिक कार्यामध्ये असलेल्या व्यक्तीच्या अधिक प्रमाणात करतात. दुर्खीमच्या मते, निराशा, व्यापारात अपयश, आर्थिक संकट इत्यादीमुळे आत्महत्येच्या प्रमाणात वृद्धी होते. अचानक एखाद्या व्यक्तीला

संपत्ती मिळणे किंवा अचानक श्रीमंत व्यक्तीवर आर्थिक संकट कोसळणे या दोन्ही गोष्टी आत्महत्येसाठी कारणीभूत आहेत. या दोन्ही अवस्थांमध्ये बहुतांश लोक अचानकपणे आपल्या सामाजिक पर्यावरणाच्या काही मुख्य वैशिष्ट्यापासून अव्यवस्थित होतात. व्यापारात नुकसान झाल्यामुळे त्या व्यक्तीच्या जीवनस्तर हा कनिष्ठ प्रतीच्या होतो. परंतु या दोन्ही अवस्थांमध्ये साधने, प्रयत्न आणि यशामधील संबंध विस्कळीत होतात. त्यामुळे लोक विवेकशून्य होतात.

दुर्खीमच्या मते, आर्थिक संकटांमध्ये व्यक्ती असंतुलित होणे किंवा भ्रमिष्ट होणे स्वाभाविकच आहे. परंतु अस्वाभाविक असंपन्नतेमुळे असे का होते? या संदर्भात उत्तर देतांना दुर्खीम म्हणतो की, सुस्थितितेची भावना आणि उद्दिष्टांच्या दृष्टिने प्रगती ही केवळ साधनावर पुरेसे नियंत्रण ठेवण्यावरच अवलंबून नाही तर उद्दिष्ट किंवा साधनांच्या स्पष्टतेवर देखील निर्भर असते. जेव्हा आकस्मिकपणे व्यक्तीला धनाची प्राप्ती होते तेव्हा, त्याच्याकरिता जगातील प्रत्येक वस्तु किंवा गोष्ट ही शक्य वाटू लागते. आणि त्याच्या इच्छा या अनंत होतात. जर व्यक्तिला आनंद प्राप्त करायचा असेल तर त्याने आपल्या इच्छा मर्यादित ठेवल्या पाहिजे आणि त्याने

स्वतः नियमाने राहिले पाहिजे. दुर्खीमच्या मते, "या नियमांच्या भंग झाल्यामुळे आत्महत्या घडून येते."

टीका (Criticism)

दुर्खीमच्या आत्महत्येच्या सिद्धांतावर पुढील प्रकारच्या टीका करण्यात आल्या आहेत.

(1) दुर्खीमने आत्महत्येच्या विश्लेषणामध्ये सामाजिक घटकांना आवश्यकतेपेक्षा जास्त महत्त्व दिले आहे.

(2) दुर्खीमने परार्थवादी आत्महत्येचे कारण व्यक्तीचे समूहाशी एकरूप होणे हे सांगितले आहे. परंतु याप्रकारच्या आत्महत्येच्या विचारप्रवाहाचे दुर्खीमने स्पष्टीकरण केले नाही.

(3) एकाकीपणाच्या भावनेचा आज बहुतेक लोक अनुभव करतात. परंतु याचा अर्थ असा नाही की, ते आत्महत्या करतील. प्रोटेस्टंट पंथीय लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त असल्याचे दुर्खीमने प्रतिपादन केले आहे, परंतु ही गोष्ट सत्य वाटत नाही. अनेक लोक एकाकीपणाचा अनुभव केल्यानंतर देखील ते आत्महत्या करीत नाहीत.

(4) दुर्खीमने सामाजिक घटकांची स्पष्टपणे व्याख्या केली नाही. दुर्खीमचा हा सिद्धांत मांडण्यामागे प्रमुख उद्देश हा पूर्वीच्या

सिध्दांतावर टीका करणे शक्य आहे. समजा, दुर्खिमच्या सिध्दांत खरा मानला तर युध्द किंवा आंदोलनाचे वेळी संपूर्ण समाज आत्महत्या का करित नाही? असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून हा सिध्दांत योग्य नाही अशी टीका करण्यात आली.

(५) ब्लोन्देल (Blondel) यांनी दुर्खीमच्या आत्महत्येच्या समाजशास्त्रीय व्याख्येवर तीव्र टिका केली. आणि त्यांनी मानसिक चिकित्सक तत्व हेच आत्महत्येसाठी प्रामुख्याने जबाबदार आहे असे प्रतिपादन केले.

② 'The Philosophy of Poverty' हा ग्रंथ मार्क्सने १८४६ मध्ये लिहिला. या ग्रंथात मार्क्सने प्रूधाँच्या भाववादी आणि सुधारवादी विचारांचे खंडन करुन प्रथमच द्वंद्वात्मक आणि ऐतिहासिक भौतिकवादाची मुलभुत तत्त्वे प्रतिपादन केली. सामाजिक अर्थव्यवस्थेच्या या विभिन्न मान्यता सैद्धांतिक रूपात सामाजिक बंध संबंधाना व्यक्त करतात. सामाजिक अर्थव्यवस्थेच्या मान्यता या परिवर्तनशील असतात. जेव्हा या मान्यतांना जन्म देणारी परिस्थिती नष्ट होते तेव्हा त्या मान्यता देखील समाप्त होतात असे सांगुन पुढे मार्क्सने या ग्रंथात हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, भांडवलशाही समाजात गरिबी, शोषण इत्यादी गोष्टी या शहणारच! या सर्व गोष्टी तेव्हाच दूर होऊ शकतील, जेव्हा समाजातुन भांडवलशाही नष्ट होईल.

③ 'The Communist Manifesto' या ग्रंथाची रचना मार्क्स आणि एंजल्स यांनी संयुक्तपणे केली. हा ग्रंथ १८४८ मध्ये प्रसिद्ध झाला. हा ग्रंथ म्हणजे वैज्ञानिक साम्यवादाच्या संबंधीचा दस्तावेज होय. या ग्रंथात कामगारांच्या क्रांतिकारी सिद्धांताची सोपी आणि संक्षिप्त व्याख्या देण्यात आली आहे. सामाजिक परिवर्तन हे वर्ग-संघर्षाशिवाय होऊ शकत नाही ही गोष्ट कॉम्युनि

स्ट घोषणापत्राने स्वीकारली आहे. कामगारांची क्रांति आणि कामगार वर्गाची राजकीय सत्ता स्थापन झाल्यानंतरच भांडवलशाही नष्ट होवून वर्गविहिन समाजाची स्थापना शक्य आहे असे विचार या ग्रंथात मांडण्यात आले आहेत.

(8) 'Das capital' हा ग्रंथ मार्क्स पूर्ण लिहु शकला नाही. एंजल्सने हा ग्रंथ पूर्ण केला. या ग्रंथाचा पहिला खंड १८६६ मध्ये प्रसिद्ध झाला. दुसरा आणि तिसरा खंड अनुक्रमे १८८५ आणि १८९४ मध्ये प्रसिद्ध झाले. या ग्रंथात मार्क्सने समाजाच्या आर्थिक नियमांचा शोध घेतला. भांडवलशाही ही समाजवादी समाजाची स्थापना करण्याकरिता आवश्यक परिस्थिती निर्माण करते. भांडवलशाहीचा विनाश करण्याची शक्ती ही कामगार वर्गामध्ये लपलेली आहे असे सांगुन वैज्ञानिक समाजवाद अर्थशास्त्रीय पद्धतीने मार्क्सने या ग्रंथात विषद केला आहे. ई. स्तोपानोवाच्या मते, 'मार्क्सचा हा ग्रंथ म्हणजे भांडवलशाहीच्या गुलामी विरुद्ध कामगारांच्या वर्ग संघर्षामध्ये त्यांचे एक शक्तिशाली सैद्धांतिक अस्त्र होय.'

(9) 'The Gotha Programme' या विस्तृत लेखामध्ये मार्क्सने ऐतिहासिक विकासाच्या नियमांना आधार बनवून सुंदर भविष्य

रेखाटून भावी कॉम्युनिस्ट समाजाची रूपरेषा स्पष्ट केली आहे.

फ्रांसमध्ये वर्ग संघर्ष, मुल्य, किंमत आणि नफा (१८६५) इत्यादी ग्रंथांची रचना देखील मार्क्सने केली. मार्क्सच्या एकुण लिखाणामध्ये भांडवलशाहीच्या ~~अद~~ विनाश आणि कम्युनिस्ट समाजाची स्थापना, वर्ग-संघर्ष, कामगारांची सत्ता इत्यादी गोष्टींचा प्रामुख्याने समावेश असलेला आढळतो.

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

SEAL